नियमित दिवाणी दावा क्र.९२/२०१२
**निशाणी १०० लगत**

**प्रतिवादीतर्फे साक्षीदाराचा शपथेवर उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. बी. आर. चौधरी यांच्यामार्फत सुरु**

१. प्रतिवादी माझे पुतणे आहेत. साक्ष द्यायला येण्याबद्दल प्रतिवादींनीच मला सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, कशाबद्दल साक्ष द्यायची आहे याबाबत मला प्रतिवादींनी सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींच्या वकीलांना सांगून प्रतिवादींनी प्रतिज्ञापत्र तयार करुन घेतले. हे म्हणणे खरे आहे की, त्या तयार केलेल्या प्रतिज्ञापत्रावर मी सही केली. हे म्हणणे खरे नाही की, सही करणेपूर्वी मी प्रतिज्ञापत्रातील मजकूर वाचून पाहिला नव्हता.

२. मी अकरावी पर्यंत शिकलो आहे. मी अनेक वर्षे कम्युनिस्ट पक्षाचा कार्यकर्ता म्हणून काम करीत आलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, सामाजिक काम करत असते वेळेस पोलीस स्टेशन, कोर्ट या ठिकाणी काही मदत लागलेस मी तशी मदत करत आलेलो आहे. त्यामुळे मला कोर्टकचेरीच्या कामाचा बऱ्यापैकी अनुभव आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी यापूर्वी न्यायालयामध्ये अनेक वेळेस साक्ष दिलेली आहे.

३. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही गोविंदा धोंडी मेहतरे व महादू खंडू मेहतरे यांनी आबा माथाजी शिंदे यांचेकडून खरेदीने घेतलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मिळकत खरेदी घेतलेनंतर गोविंदा मेहतरे व महादू मेहतरे यांनी आपसात वाटप करुन घेतले. हे म्हणणे खरे आहे की,

त्याप्रमाणे संबंधित तलाठी व रेव्हेन्यु कर्मचारी यांनी वाटपाची नोंद केली. हे म्हणणे खरे नाही की, १९३१ साली भूमी अभिलेख कार्यालयाकडून फाळणी पार्टीचे काम होऊन हिस्सा नं. १२ तयार करुन त्याची नोंद नं. ५३५ झाली. हे म्हणणे खरे आहे की, वाटपानंतर सर्वे नं. ४३९/१ हा गोविंदा धोंडी मेहतरे याचे हिस्स्यास तसेच सर्वे नं. ४३९/२ हा महादू खंडू मेहतरे याचे हिस्स्यास गेला. हे म्हणणे खरे आहे की, महादू मेहतरे यांनी त्यांचे वाटपास आलेला सर्वे नं. ४३९/२ ही मिळकत त्यांचा मुलगा यमाजी महादू सुरसे यांचे नावे केली व त्याची नोंद नं. १०५७ अशी झाली. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर यमाजी सुरसे यांनी त्यांचे भाऊ भागा व नारायण यांना वडिलोपार्जित मिळकतींचे १९६६ साली वाटप करुन दिले. त्याच्याबद्दल फेरफार नोंद नं. २९२६ झाली. हे म्हणणे खरे आहे की, यमाजी सुरसे यांनी त्यांचे दोन भाऊ भागा व नारायण यांना वाटप करुन दिल्यामुळे सर्वे ४३९/२ चे सर्वे नं. ४३९/२ अ व ४३९/२ ब असे दोन भाग झाले. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर भागा व नारायण यांनी देखील त्यांचे मुलांना वाटप करुन दिले. हे मला सांगता येणार नाही की, गोविंदा मेहतरे यांनी देखील सर्वे नं. ४३९/१ चे त्यांच्या मुलांमध्ये वाटप करुन दिले किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, महादू मेहतरे यांचे वारसांना जी काही मिळकत मिळालेली आहे ती सर्वे नं. ४३९ यामधील आहे. हे म्हणणे खरे नाही की, गोविंदा धोंडी मेहतरे यांनी त्यांना मिळालेल्या सर्वे नं. ४३९/१ पैकी काही मिळकत धर्मशाळेस दान दिली होती.

४. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीस लागून धर्मशाळा आहे. हे म्हणणे खरे आहे की, जिल्हाधिकारी यांचे आदेशाने धर्मशाळेच्या नावाबाबतची नोंद करण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे नं. ४३९ खरेदी केलेपासून त्याचे जसे जसे वाटप झाले तसे तसे स्वतंत्र ७/१२ उतारे

ज्याच्या त्याच्या नावे झालेले आहेत. साक्षीदार पुन्हा सांगतो की, ७/१२ उतारे ज्याच्या त्याच्या नावे लागलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी ज्याच्या त्याच्या नावे ७/१२ उतारे लागलेले आहेत त्याप्रमाणे ज्याच्या त्याच्या कब्जात त्याच्या नावे नोंद असलेले क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, महादू सुरसे यांचेपासून ते त्यांचे पणतू म्हणजेच दाव्यातील प्रतिवादी यांचेपर्यंत आजपर्यंत कोणीही ७/१२ उताऱ्यांवरील नोंदींबाबत कधीही तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील, काका, पुतणे यांनी देखील क्षेत्राबाबत कधीही तक्रार केलेली नाही.

५. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत वादींना त्यांचे आजोबा गोविंद धोंडी यांचेपासून मिळालेली आहे. वादींना दावा मिळकत कशी मिळाली हे मला सांगता येणार नाही. साक्षीला येण्यापूर्वी मी दावा मिळकतीचा ७/१२ उतारा पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आजपर्यंत दावा मिळकतीचा ७/१२ उतारा हा प्रतिवादींच्या किंवा त्यांच्या वडिलांच्या किंवा त्यांच्या आजोबांच्या यापैकी कोणाच्याही नावावर नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही वादींच्या वडिलोपार्जित मालकी हक्काची मिळकत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत वाडवडिलांपासून वादींच्याच कब्जात आहे.

६. मी माझ्या प्रतिज्ञापत्रामध्ये परिच्छेद क्र. ३ मध्ये सर्वे नं. ४३९ चे गोविंदा व महादू यांचे आपापसात अर्ध्या अर्ध्या क्षेत्रावर वाटप झाले असे नमूद केले आहे परंतु तसे वाटप झालेबाबतचा कागद मी स्वतः कधीही पाहिलेला नाही. नोंद नं. ५३५ प्रमाणे वाटप गैरसमजुतीतून व अन्यायकारकरीत्या झाले याबाबत महादू मेहतरे यांच्यापासून ते आजपर्यंत

सदर वाटपाबाबत कोणीही तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र. ६ ते १० मधील मजकूर खोटा नमूद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाटप झालेनंतर दावा मिळकत वादींच्या पूर्वजांच्या मालकी हक्काने कब्जात होती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींचा दावा मिळकतीशी कोणताही हक्कसंबंध नाही व कब्जाही नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी पुतणे असल्यामुळे त्यांच्या प्रेमापोटी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास ःः पुर्ण.**

**फेरतपास ःः नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

sd/-
( जे.एम.अग्निहोत्री )
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
नांदगाव
दिनांक २९.०४.२०२५

माझे समक्ष,

sd/-
( जे.एम.अग्निहोत्री )
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
नांदगाव